रे.मु.नं.४६८/२०१८
निशाणी क्र.३६

## दाव्यातील नि.क्र.३६ वरील आदेश
## (पारित दिनांक २२ फेब्रुवारी, २०२३)

प्रस्तुतचा अर्ज दाव्यातील वादीतर्फे नि.३६ वर दाव्यामध्ये दुरुस्ती करणेस परवानगी मिळणेकरिता दाखल केलेला आहे.

०२. अर्जदारांचे कथन असे आहे की, सदरचा दावा अर्जदाराने दावा मिळकती संदर्भात ठरावासाठी, वाटपासाठी व मनाईसाठी दाखल केलेला आहे.

०३. प्रस्तुत अर्जामध्ये वादी कथन करतात की, प्रस्तुतचा दावा प्रलंबित असतांना प्रतिवादी क्र. १ यांनी प्रतिवादी क्र. ४ ची पत्नी स्वाती नवनाथ ठाकर यांना रजिस्टर दस्त क्र. ५८२४/२०२१ अन्वये विक्री केलेले आहे. त्यामुळे प्रस्तुतचा दावा वाटपासाठी प्रलंबित असतांना प्रतिवादी क्र. १ यांनी दावा मिळकतीमधील त्यांचे तथाकथित हिश्श्याचे क्षेत्र विक्री केल्याने प्रस्तुतकामी सदर खरेदीदस्ताचे अनुषंगाने स्वाती नवनाथ ठाकर यांना प्रस्तुतकामी आवश्यक पक्षकार म्हणुन सामील करण्याकरीता व त्याअनुषंगाने प्रस्तुत दाव्यामध्ये दुरुस्ती करण्याकरीता वादी यांनी सदरचा अर्ज अभिलेखावर दाखल करुन तो मंजुर व्हावा अशी विनंती केली आहे.

०४. सदर अर्जास प्रतिवादी यांनी नि. ३८ वर हरकत नोंदवली. त्यांचे म्हणण्याप्रमाणे वादीचा नि.३६ वरील अर्ज प्रमाणिकपणाचा व ख-या स्वरुपाचा नाही. सदर अर्जास कोणतेही कारण घडलेले नाही. वादीचे दुरुस्ती अर्जातील सर्व मजकुरामुळे मुळ दाव्याच्या स्वरुपात बदल होण्याची शक्यता आहे. वादींनी त्यांचे म्हणयाच्या समर्थनार्थ कोणताही कागदोपत्री पुरावा दाखल केलेला नाही. तसेच प्रतिवादी यांचा शेती व्यवसाय असुन सदर शेती व्यतिरीक्त त्यांना उत्पन्नाचा कोणताही मार्ग नाही. त्यामुळे दावा मिळकत ति-हाईत इसमास विक्री करण्याची कोणतीही शक्यता नाही. प्रतिवादी यांनी त्यांची स्वखरेदीची मिळकत त्यांच्या पत्नीस दिलेली आहे. प्रस्तुतकामी सदर अर्जामुळे गुंतागुंत वाढण्याची शक्यता असुन प्रस्तुत दावा गुणदोषावर चालविण्यास अडचणी येणार आहेत. त्यामुळे वादी यांचा अर्ज नामंजुर व्हावा अशी विनंती प्रतिवादी यांनी केलेली आहे.

०५. संपुर्ण अभिलेखावरील अवलोकन केले. दोन्ही बाजुंचा युक्तीवाद ऐकला. अर्जदाराचे कथन व पटलावरील कागदपत्रे पाहता वाद मुद्दे निश्चित करुन त्यावर मी माझे निष्कर्ष कारणमिमांसेसह खालीलप्रमाणे नोंदवित आहेः

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १) | वादीनी अर्जामध्ये सुचविलेली दुरुस्ती करुन मिळणेस पात्र आहेत काय? | होकारार्थी |
| २) | आदेश काय? | अर्ज मंजुर करणेत येत आहे. |

## कारणमिमांसा

### वाद मुद्दा क्रमांक १ करिताः

०६. अभिलेखावरील कागदपत्रांचे अवलोकन केले. वादी व प्रतिवादी यांचेतर्फे विद्वान विधीज्ञांचा युक्तिवाद ऐकला. वादी यांनी प्रस्तुतचा अर्ज नि.३६ वरील अर्जाप्रमाणे दुरुस्ती करण्याकरीता दाखल केलेला आहे. वादी यांच्या सदर कथनाप्रमाणे प्रस्तुतचा दावा प्रलंबित असतांना झालेल्या व्यवहाराच्या अनुषंगाने तसेच मुळ वारसांच्या दरम्यान सरसनिरसमानाने वाटप झालेले नसताना देखील प्रतिवादी क्र. १ यांनी दावा मिळकतीबाबत व्यवहार केलेले आहेत. त्यामुळे प्रस्तुतचा अर्ज मंजुर करावा अशी विनंती त्यांनी केलेली आहे. प्रतिवादी यांनी सदर अर्जावर दिलेल्या म्हणण्याचे अवलोकन केले असता असे दिसुन येते की, प्रतिवादी यांनी वादीच्या प्रस्तुत अर्जास मोघम स्वरुपाचे म्हणणे दाखल केलेले आहे. वादीचा प्रस्तुतचा अर्ज मंजुर केल्यास मुळ दाव्याच्या स्वरुपात कोणत्याप्रकारे बदल होईल याबाबतचे कोणतेही स्पष्टीकरण प्रतिवादी यांनी त्यांच्या म्हणण्यामध्ये दिलेले नसल्याचे स्पष्टपणे दिसुन येत आहे.

०७. अभिलेखावरील कागदपत्रांचे अवलोकन केले असता वादी यांनी त्यांचे दिलेल्या अर्जामधील कथनांचा विचार करता प्रतिवादी यांचे झालेल्या व्यवहारांबाबत वादी यांना दाद मागण्याकरीता प्रस्तुत दाव्यात दुरुस्ती करावयाची आहे. वादी यांनी प्रस्तुतचा दावा हा जाहीर ठराव, वाटपाचा व मनाईकरीता दाखल केला असुन वादी म्हणतात ती दुरुस्ती पाहता त्यांनी प्रतिवादी यांनी केलेल्या व्यवहारांकरीता दिलेले स्पष्टीकरण आहे. कायद्यातील प्रचलित तरतुदीनुसार दाव्यामध्ये कोणत्याही टप्प्यावर पक्षकारांच्या दरम्यान असलेले वाद अंतिमतः निकाली काढण्याकरीता दुरुस्ती करता येवु शकते. अर्जदारांनी सुचविलेली दुरुस्ती कायद्यांर्तगत असुन सदर दुरुस्तीमुळे प्रतिवादींच्या कथनास कोणतेही हानी पोहोचत नाही. याउलट दाव्याचे अंतिम निकाल गुणदोषावर होण्यास मदतच होणार आहे. परिणामतः वाद मुद्दा क्र. १ चे उत्तर होकारार्थी नोंदवुन मी, खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहेः

## आदेश

१. नि. ३६ वरील अर्ज मंजुर करणेत येत आहे.

२. अर्जदार यांनी अर्जातील सुचविलेली दुरुस्ती दाव्यामध्ये आजपासुन १४ दिवसांचे आत किंवा पुढील नेमलेल्या तारखेपुर्वी करावी, तसेच दुरुस्त दाव्याची प्रत दुरुस्ती केलेच्या दिवशी दाखल करावी.

३. दोन्ही बाजुंनी आदेशाची दखल घ्यावी.

**सही/-**
**(जी.ए.कुलकर्णी)**
४थे सह. दिवाणी न्यायाधीश क. स्तर, दौंड,
ता. दौंड, जि. पुणे.

ठिकाणः दौंड,
दिनांक २२/०२/२०२३